# राष्ट्रीय बातमीपत्र  - 01.30 AM

दिनांकः 04.08.2020 वारः मंगळवार

## ठळक बातम्या

- कोणतेही अतिक्रमण सहन करणार नाही, भारतानं चीनला पुन्हा एकदा सुनावलं.
- देशात काल दिवसभरात ६ लाख ६१ हजार ८९२ कोरोना चाचण्यांचा विक्रम.
- विशेष दर्जा काढून घेतल्याच्या वर्षपुर्तीला, जम्मू - काश्मीर विकासाच्या वाटेवर.
- अयोध्येत उत्सवी वातावरण, उद्या पंतप्रधानांच्या हस्ते राममंदिराचं भुमीपूजन.

आणि

- मुसळधार पावसामुळे मुंबईतलं जनजीवन विस्कळित, उद्याही अतिवृष्टीचा इशारा.

**भारत-- चीन  चर्चा**

भारत आपल्या एकता आणि अखंडतेचं कायम रक्षण करेल आणि आपल्या भूमीवर कोणतही अतिक्रमण सहन करणार नाही, असं भारतानं पुन्हा एकदा चीनला सुनावलं आहे. भारत आणि चीन यांच्या दरम्यान, कमांडर स्तरावरील चर्चेची पाचवी फेरी, रविवारी मोल्डो इथं पार पडली, त्यावेळी हा संदेश चीनच्या अधिकाऱ्यांना दिला असल्याचं ,चर्चेनंतर लेफ्टनंट जनरल हरिंदर सिंग यांनी सांगितलं. चीन नं लडाख भागात काही ठिकाणांहून सैन्य मागे घेतलं असलं तरी, पॅनगोंग त्सो आणि फिंगर फोर या भागातूनही सैन्य मागे घ्यावं अशी भारताची मागणी आहे. चीनच्या सीमा भागातल्या हालचालींना प्रतिसाद म्हणून, भारतानं दौलत बेग ओल्डी भागात सैन्य दलांच्या तुकड्या आणि शस्त्रसाठा यांची जमवाजमव केली आहे.

**चाचण्या**

देशात काल दिवसभरात विक्रमी ६ लाख ६१ हजार ८९२ कोरोना चाचण्या करण्यात आल्या. एकाच दिवसात झालेल्या चाचण्यांची ही आतापर्यंतची सर्वोच्च संख्या आहे. देशात आजपर्यंत २ कोटी ८लाख ६४  हजारांहून अधिक कोरोना चाचण्या झाल्या आहेत.

**कोविड राष्ट्रीय**

देशातील कोरोनाबाधितांच्या संख्येत काल दिवसभरात ५२ हजार ५० नवीन बाधितांची भर पडली. त्यामुळे आतापर्यंतच्या बाधितांची एकंदर संख्या १८ लाख ५५ हजार ७४५ झाली आहे. सध्या यापैकी ५ लाख ८६ हजार २९८ रुग्ण उपचार घेत आहेत. काल दिवसभरात ४४ हजार ३०६ रुग्ण बरे होऊन  घरी गेले. बरे झालेल्याची एकंदर संख्या बारा लाख ३० हजार ५०९ असून, रुग्ण बरे होण्याचा दर ६६ पूर्णांक ३१ शतांश टक्के आहे. देशात काल ८०३ रुग्णांचा मृत्यू झाला असून, आतापर्यंत कोविड-19 चे, ३८ हजार ९३८ रुग्ण दगावले आहेत. मृत्यू दरात आज आणखी घट झाली असून तो २ पूर्णांक 10 शतांश टक्के झाला आहे.

**कोविड आकडेवारी**

महाराष्ट्रात नव्या कोरोनाग्रस्तांपेक्षा बरे झालेल्यांची संख्या जास्त, असं काल सलग दुसऱ्या दिवशी घडलं.बरे झालेल्या रुग्णांची संख्या काल आढळलेल्या नव्या कोरोनाबाधितांपेक्षा, 1हजार 252 नं जास्त होती. त्यामुळे रुग्ण बरे होण्याचा दरही सुधारत, आता राष्ट्रीय दराच्या आसपास 63 पुर्णांक 76 शतांश टक्क्यांवर आला आहे.

**जम्मू काश्मीर विकास**

जम्मूकाश्मीरचा विशेष दर्जा काढून घेतल्याच्या घटनेला उद्या एक वर्ष पूर्ण होत आहे.राज्यात, विशेषतः श्रीनगरसारख्या सतत दहशतवादाचं लक्ष्य बनत असलेल्या भागात,विकासकामांची गती वाढलीआहे. यानिमित्तानं राज्यातल्या विकासकामांचा, आमचे श्रीनगरचे प्रतिनिधी सुनील कौल यांनी घेतलेला हा आढावा.

गेल्या पाच सहा वर्षात जम्मू काश्मीरमध्ये सरकारनं अनेक विकासकामं केली आहेत. पायाभूत सुविधांच्या विकासामुळे जम्मू आणि श्रीनगर या राज्याच्या दोन राजधान्यांमधलं अंतर कमी झालं आहे. श्रीनगरमधल्या जहाँगीर चौक आणि रामबाग दरम्यानच्या उड्डाणपुलाचं बरेच दिवस रखडलेलं काम पूर्ण झाल्यामुळं तिथल्या नागरिकांची रोजच्या वाहतूककोंडीतून सुटका झाली आहे. केवळ तीन महिन्यातच पूर्ण झालेलं साठ स्लॅबचं काम हे प्रशासनाच्या गतीमान प्रयत्नाचंच द्योतक आहे. कुठल्याही उड्डाणपुलाच्या बांधकामात केलेलं हे सर्वात वेगवान काम आहे. जम्मू अखनूर रस्त्याचं चौपदरीकरण, चेन्नानी सुध महादेव रस्ता यांचं कामही वेगातसुरू आहे. राज्यातल्या विकासकामांमुळे गुंतवणूकीचा ओघही नजीकच्या भविष्यात 10 ते15 हजार कोटींवर जाईल अशी अपेक्षा जम्मू काश्मीरच्या उद्योग आणि वाणिज्य विभागाचे सचिव मनोज द्विवेदी यांनी आकाशवाणीशी बोलताना व्यक्त केली.

आकाशवाणी बातम्यांसाठी मेघना देशपांडे, पुणे

**श्रीनगर संचारबंदी**

जम्मू काश्मीरचा विशेष दर्जा काढून घेतल्याच्या वर्षपुर्तीच्या पार्श्वभूमीवर ,हिंसक आंदोलन होण्याची शक्यता गुप्तचरांनी वर्तवल्यानंतर, श्रीनगरमध्ये संचारबंदी लागू करण्यात आली आहे. ही संचारबंदी तत्काळ लागू होत असून उद्यापर्यंत ती कायम असेल, असं श्रीनगरचे जिल्हान्याय दंडाधिकारी शाहीद इक्बाल चौधरी यांनी सांगितलं.

**निकाल**

आताच हाती आलेल्या वृत्तानुसार नागरी सेवा परीक्षा २०१९ चे निकाल, केंद्रीय लोकसेवा आयोगाने जाहीर केले आहेत. या परीक्षेत एकूण ८२९ उमेदवारांची वेगवेगळ्या प्रशासकीय सेवांमध्ये निवड करण्यात आली आहे. प्रतीप सिंग हा विद्यार्थी देशभरात अव्वल ठरला असून मुलींमध्ये प्रतिभा वर्मा ही विद्यार्थिनी

अव्वल ठरली आहे. अंतिम निकाल केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**अयोध्या भूमिपूजन**

अयोध्येत राममंदिराच्या भूमिपूजनासाठी, कालपासून सुरू झालेल्या तीन दिवसांच्या धार्मिकविधी दरम्यान, आज सहा तासांचं विशेष अनुष्ठान होत आहे. भूमिपूजनाचा मुख्य कार्यक्रम उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमात त्यांच्याबरोबर देशातील आणि नेपाळमधील मिळून 135 धार्मिक परंपरांचे प्रमुख सहभागी होण्याची अपेक्षा आहे. अयोध्येतील काही प्रतिष्ठित नागरिकांनाही कार्यक्रमाचं निमंत्रण देण्यात आलं आहे. या ऐतिहासिक समारंभासाठी अयोध्येत सध्या महोत्सवाचं वातावरण आहे.

**फडणवीस**

अभिनेता सुशांतसिंग राजपूत याच्या मृत्युप्रकरणी सुरू असलेल्या तपासावर देखरेख ठेवण्यासाठी, बिहारहून आलेल्या आयपीएस अधिकाऱ्याला राज्यातील अधिकाऱ्यांनी विलगीकरणात ठेवल्याबद्दल, भाजपचे नेते आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नाराजी व्यक्त केली. अशा कृतीमुळं तपासातील पारदर्शकतेबाबत, जनतेच्या मनात अविश्वास निर्माण होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. पाटणा शहराचे पोलीस अधीक्षक विनय तिवारी हे मुंबईत पोहोचताच बृहन्मुंबई महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी त्यांना तातडीनं 15 ऑगस्टपर्यंत विलगीकरणात ठेवलं आहे.

**सिद्धरामय्या**

कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना कोरोना विषाणूची बाधा झाली असून डॉक्टरांच्या सल्ल्यावरून ते रुग्णालयात दाखल झाले आहेत. आपली प्रकृती सध्या स्थिर असून आपल्यावर उपचार सुरु झाले आहेत. तसंच आपल्या संपर्कात आलेल्या व्यक्तींनी स्वतःची चाचणी करून घ्यावी  अस आवाहन सिद्धरामय्या यांनी केल आहे.

**न्यूयॉर्क फिल्म फेस्टिव्हल**

राष्ट्रीय पारीतोषिक प्राप्त "सन राईज' या माहितीपटाला आणि गीतू मोहनदास दिग्दर्शित "मूथून' या चित्रपटाला २० व्या आंतरराष्ट्रीय न्यूयॉर्क इंडियन फिल्म फेस्टिव्हलमध्ये सर्वश्रेष्ठ पुरस्कारांनी गौरवण्यात आल आहे. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर हा चित्रपट महोत्सव यावर्षी आभासी पद्धतीन पार पडला. २४ जुलै पासून सुरू झालेल्या या चित्रपट महोत्सवामध्ये भारतीय उपखंडातील ४५ लघुपट, माहितीपट आणि चित्रपट सादर करण्यात आले. त्यामध्ये आसामी, बंगाली, हरियानवी, हिंदी,इंग्रजी, लडाखी, मैथिली,मलयालम, मराठी, नेपाळी आणि तमिळ चित्रपटांचा समावेश होता. या चित्रपट महोत्सवाची सांगता रविवारी झाली.

**बिहार पूर**

बिहारमध्ये दरभंगा आणि मुझफ्फरपुर इथं नद्यांनी किनारे ओलांडल्यानं राज्यातील पूरस्थिती आणखी बिकट झाली आहे. या दोन जिल्ह्यांमध्ये पूराचं पाणी सखल भागात शिरलं आहे. गंडक आणि भागमती नद्यांच्या पातळीतही वाढ झाली आहे. बिहारमधील १४ जिल्ह्यांमधील 56 लाख नागरिकांना पुराचा फटका बसला आहे.

**मुंबई लोकल**

मुंबईसह उपनगरात आणि ठाण्यात काल रात्रीपासून संततधार पाऊस पडत आहे. मुसळधार पावसामुळे मुंबईतलं जनजीवन विस्कळित झालं आहे. आज आणि उद्या मुंबईसह कोकणात काही ठिकाणी अतिवृष्टीचा इशारा हवामान विभागानं आधीच दिला होता. दादर प्रभादेवी सह अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचल्यामुळे आणि दुपारी समुद्राला उधाण येण्याची शक्यता असल्यानं.पश्चिम उपनगरीय रेल्वे ची वांद्रे ते चर्चगेट दरम्यानची सेवा बंद ठेवण्यात आली आहे विरार, अंधेरी वांद्रे दरम्यानची लोकलसेवा मात्र सुरु राहील अशी माहिती रेल्वे अधिकाऱ्यांनी  ट्वीटर संदेशाद्वारे दिली आहे. समुद्राला उधाण आल्यावर वडाळा आणि  परळ भागातही पाणी साठण्याची शक्यता असल्यानं, मध्य रेल्वेच्या मुख्य आणि हार्बर मार्गावरचीलोकल सेवा ही बंद ठेवण्यात आली आहे. दरम्यान, वाशी, पनवेल, ठाणे आणि कल्याण दरम्यान शटल सेवा सुरु ठेवण्यात आली असून, एक्स्प्रेस आणि मेल रेल्वेच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला असल्याची माहिती मध्य रेल्वेच्या अधिकार्यांनी ट्वीटर संदेशाद्वारे दिली आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.
नमस्कार.